# <u>प्रेसनोट</u>

ला.प्र.वि,वाशिम.

दि.१७/०७/२०२६

आरोपी खाजगी ईसम, सतिश बबन कव्हर रा.तामसी ता.जि.वाशिम यांनी तक्रारदार यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याकरीता दि.१५/०७/२०२६ व दि.१७/०७/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान ५०००/– रु लाच मागणी करुन तडजोडीअंती ४०००/– मागीतले. दि.१७/०७/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान ४,०००/–रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | आरोपी खाजगी ईसम, सतिश बबन कव्हर रा.तामसी ता.जि.वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | ४,०००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याकरीता ५,००० रुपये लाच मागणी करुन तडजोडी अंती ४,००० रु मागीतले व सापळा कारवाई दरम्यान ४,०००रु स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | श्री.जगदीश परदेशी,पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

गुन्हयाची हकीकत अशाप्रकारे आहे की, दि.१५/०७/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय वाशिम येथे हजर येवुन गैरअर्जदार कंपाउंडर श्री.सतिश कव्हर, अस्ती विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम हे त्यांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यासाठी १०,०००/–रू लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रार दिली.

सदर तक्रारीची शासकीय पंचासमक्ष पडताळणी दि.१५/०७/२०२६ तसेच दि.१७/७/२०२६ रोजी केली असता कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यासाठी कंपाउंडर श्री.सतिश कव्हर, अस्ती विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांनी ५,०००/– रु. लाचेची मागणी केली व तडजोडीअंती ४,०००/–रु. स्पष्टपणे लाचेची मागणी करून त्याचदिवशी लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दि.१७/०७/२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान नमुद कंपाउंडर श्री.सतिश कव्हर, अस्थि विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांनी तक्रारदार राजेंद्र तुळशिराम उंदरे यांचे कडुन ४,०००/–रु. लाच रक्कम जिल्हा सामान्य रूग्णालयातील अस्थि कक्षामध्ये पंचासमक्ष स्विकारले. यावरून आरोपी सतिश बबन कव्हर, वय ३३ वर्ष, रा.तामसी यांना सदर गुन्हयात ताब्यात घेण्यात आले. आरोपी कडुन लाच रक्कम ४,०००/– रु हस्तगत केली.

सदरच्या संपुर्ण कारवाई दरम्यान आरोपी खाजगी ईसम, सतिश कव्हर यांनी तक्रारदार यांना तेच अपंगत्वाचे प्रमाणपत्र देणारे शासकीय कर्मचारी असल्याचे भासवून व प्रभाव पाडुन तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचे हे कृत्य कलम ७A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे होत असल्याने आरोपी विरुध्द पो.स्टे. वाशिम (शहर), जि. वाशिम येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक, श्री बापू बांगर, अपर पोलीस अधिक्षक श्री सचिंद्र शिंदे, अॅन्टीकरप्शन ब्युरो अमरावती, यांचे मार्गदर्शनात व पर्यवेक्षण तपास अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री जगदिश परदेशी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे पथकातील कर्मचारी पोहवा नितीन टवलारकर, विनोद मारंकडे,योगेश खोटे, अमोल काळमुंदळे,पो.कॉ महेश परमेश्वरे,चापोशि मंगेश देवकते ला.प्र.वि.वाशिम यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टीकरप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनीक्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक–७५०७०५५२०५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन जगदीश परदेशी,पोलीस उपअधिक्षक अॅन्टीकरप्शन ब्युरो, वाशिम यांनी केले आहे.

(जगदीश परदेशी)
पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.